# महफिल
# -ए-
# प्रशांत ४

प्रशांत दांडेकर



- तलत महमूद
- महेंद्र कपूर
- महंमद रफ़ी
- मन्ना डे
- हेमंत कुमार
- मुकेश
- किशोरकुमार

# महफ़िल - ए – प्रशांत ४

लेखन - प्रशांत दांडेकर.

9821947457

prashant.dandekar@rediffmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

मुखपृष्ठ , मांडणी आणि संपादन : सचिन काकडे

www.esahity.com

esahity@gmail.com

eleventh floor, eternity
eastern express highway
Thane, 400604

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी

ई .साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे-

©esahity Pratishthan®2015

# प्रस्तावना



मेहफिल च्या या भागाचे प्रास्ताविक लिहिताना खरे तर मला शब्दच सुचत नाही आहेत.

सुरांच्या सप्तर्षी समूहाबद्दल लिहिताना अनेक आठवणी मनात रुंजी घालत होत्या. मला माहित आहे कि रफी, किशोर, मुकेश यांच्याबद्दल फक्त २ - ३ पानेच लिहिणे म्हणजे दुधाची तहान ताकावर भागविण्यासारखे आहे.पण याक्षणीच मी तुम्हा रसिकांना वचन देतो की आपणा सर्वांच्या सेवेत मी भाग २ नक्की घेऊन येणार आहे.

गायक म्हणून हे सर्व सात ही जण महान होतेच पण माणूस म्हणून देखील ते महान आहेत विशेषतः रफी, मुकेश, तलत यांचे अनेक किस्से या बाबत मशहूर आहेत. महेंद्र कपूर व रफी साहेब यांच्यातील गुरु शिष्याचे नाते देखील आपल्याला या भागात अनुभवायला मिळेल. एकमेकांचे प्रतिस्पर्धी असून देखील या गायकांना एकमेकांविषयी किती

आदर होता हे या भागात वाचले की  ऑफिस मध्ये सहकाऱ्यांसोबत  गळेकापू स्पर्धा करण्याचे आपल्या मनातील हीन विचार क्षणार्धात जळून खाक होतील.

सूर ने निरागस असतात पण त्या सुरांना योग्य तो कंठ प्राप्त झाल्यास तेच सूर दुःखावरची हळुवार फुंकर बनतात किंवा गालावरून फिरणारे मोरपीस होतात. या सप्तकंठामुळे सुरांना जसे अध्यात्माचे कोंदण लाभले तसेच मादक, अवखळ प्रेमाचे पंख देखील.

आजकाल च्या वैद्यकीय क्षेत्रामध्ये रुग्णाला बरे करण्यासाठी म्युझिक थिअरपी वापरतात. पण आपल्या या गायकांनी आपले हे गायन कौशल्य कधीच या क्षेत्रामध्ये वापरले होते व लोकांना जीवदान देखील दिले होते.

या सर्व आठवणी /किस्से आपण आवडीने वाचाल अशी आशा करतो. आपल्या आवडत्या गायकाबरोबरच इतर ही गायक आजपासून तुम्हाला आवडू लागोत हीच अपेक्षा मी तुम्हा सर्व रसिकांकडून करत आहे.

आपला यार-ए-मेहफ़िल

प्रशांत दांडेकर

या पुस्तकात जिथे जिथे गाण्याचे शब्द आहेत

तिथे क्लिक केल्यावर

बॅकग्राउंडला गाणे ऐकू येईल बरं का!

ट्राय करा.

मात्र सोबत इंटरनेट सुरू हवं.

## जलते है जिस के लिए, तेरी आखों के दिए ढूंढ लाया हूँ वही, गीत मैं तेरे लिए



**तलत** व तलम हे शब्द जवळ पास सारखेच, फरक शब्द एकाच अक्षराचा. पण जेव्हा तलत मेहमूद या गायकाचा विषय येतो तेव्हा हाच फरक पार पुसला जातो. आवाजातील कंप व मोरपीस गालावरून फिरावे असा अनुभव देणारा मलमली आवाज यामुळे हा गायक आजही सर्वांच्या मनावर व कानांवर अधिराज्य गाजवीत आहे मेरी याद में तुम ना आँसू बहाना (मदहोश), फिर वोही शाम, वोही गम, वोही तनहाई है, दिल को समझाने तेरी याद चली आयी है (जहां आरा), आंसू समझ के क्यो मुझे (छाया) या सारख्या दर्दभऱ्या गाण्यांमुळे तलत म्हणजे दुःखाचा आवाज असे समीकरण झाले पण हे अर्ध सत्य आहे तलतचा आवाज म्हणजे खरे तर आपल्या मनातल्या प्रत्येक नाजूक, तरल भावनेचा अविष्कार होता. म्हणूनच प्रेमाचा पहिला वहिला ईजहार, तो ही प्रेयसी समोर बोलण्याची हिम्मत न झाल्याने फोनवरून केलेला... ते नाजुक क्षण फक्त तलतच्या सुरातच शोभून दिसतात.

तलतच्या आवाजात एवढी कशिश आहे कि तलतच्याच कट्टर चाहत्यांच्या शब्दांमध्ये सांगायचे झाल्यास.. एखादा सुडाने पेटलेला माणूस जेव्हा डोळ्यात अंगार व हातामध्ये खंजीर घेऊन एखाद्याचा खून करण्यास बाहेर पडलेला असतो पण वाटेतच त्याच्या कानांवर तलतचा आवाज पडतो तेव्हा क्षण भर तो माणूस सर्व काही विसरून तिथेच थिजून जातो व त्याच्या मनातील सर्व किल्मिष नष्ट होते. कोळयाच्या जाळयावर जसे

दवबिंदू पडल्यावर त्या कळकट, चिकट, गोष्टीचे शानदार नक्षीमध्ये रुपांतर होते तसे काहीसे तलतच्या आवाजाने होते  आपल्या लाडक्या तलतची सुरेल सफर सुरु झाली ती बांग्ला भाषेतून. तपन कुमार या नावाने त्याने एक दोन नाही तर तब्बल शंभर एक गाणी गायली  पण त्याच्या हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिल्या गाण्याला हातभार लागला तो अनिल बिस्वास यांचा.

अनिल बिस्वास यांना पहिल्याच भेटीत तलतच्या आवाजातील कंप खूप भावला. पण दुसऱ्या भेटीत हाच कंप गायब झाल्याचे त्यांना दिसून आले. त्यांनी तलतला यावरून हटकले. तेव्हा तलत म्हणाले काही जणांना माझ्या आवाजातील कंप म्हणजे माझ्यामध्ये गाताना  आत्मविश्वासाची उणीव आहे असे वाटते. म्हणूनच मी हा  कंप जाणीव पूर्वक कमी केला. तेव्हा अनिलदा म्हणाले अरे वेड्या अशी चूक करू नकोस. का कंपच तुला दुसऱ्यांपेक्षा वेगळा बनवत आहे. नाही तर मुंबई मध्ये काय गायकांची कमतरता आहे? अनिलदा यांनी वेळेवर तलतला अडविले म्हणून बरे झाले; नाही तर कानसेनांना एका स्वर्गीय आवाजाला मुकावे लागले असते.

तलत करिअरच्या सुरुवातीस द्विधा मनस्थितीमध्ये होते. नायक व्हायचे का गायक या नादात त्यांनी दोन्ही डगरींवर पाय ठेऊन पाहिले. त्यांनी तब्बल १३ चित्रपटांमध्ये काम केले. 'एक गांव की कहानी', 'लालारुख' आणि "सोने की चिडीया" असे काही चित्रपट त्यांनी केले ज्यात त्यांना माला सिन्हा, नूतन, सुरैय्या यांची साथही लाभली. या सर्व चित्रपटांची गाणी सुपरहिट होऊनही अभिनेता म्हणून तलत काही यशस्वी ठरला नाही.

त्यामुळे वेळीच तलत सावरले व त्यांनी  नायक म्हणून नाही तर गायक म्हणून पुढे वाटचाल करायचे निश्चित केले.

मधुर, आश्वासक, मृदू आवाजाप्रमाणेच असलेल्या स्वभावाच्या बळावर, त्याने अनिल विश्वास आणि सज्जाद हुसेन यांसारख्या ईंडस्ट्रीने भांडकुदळ ठरवलेल्या संगीतकारांकडेही सहजगत्या काम मिळवलं.

संगदिल या चित्रपटातले "ये हवा ये रात ये चांदनी" हे गाणे सज्जाद हुसेन यांचे सर्वोत्तम गाणे तलतच्याच आवाजात आहे. तलत ने ईंडस्ट्रीतल्या जवळपास सर्वच संगीतकारांकडे सारखेच काम केले. त्याचे उर्दु उच्चार हे इतर  कुठल्याही गायकापेक्षा जास्त स्वच्छ होते
पण त्याला खरा भक्कम आधार मिळाला तो नौशाद यांचा. बरसात चित्रपटाचे संगीत मशहूर झाल्यामुळे नौशादजी नकळतपणे शंकर जयकिशन यांना आपले भावी प्रतिस्पर्धी मानू लागले होते. मुकेश हा शंकर जयकिशनच्या गटातील असल्याने नौशाद यांनी तलतची निवड आपल्या साठी केली. पण तलत मात्र कोणालाच आपला प्रतिस्पर्धी मानायचा नाही. मधुमतीच्या वेळी संगीतकार सलिल चौधरी तलतला घेऊ इच्छित होते पण त्याच वेळी मुकेशचा पडता काळ चालू होता. म्हणूनच मग तलत ने आपल्या जागी मुकेशला घ्या असा आग्रह सलिलदा  यांना केला. एवढा मनाचा  मोठेपणा त्यांच्याकडे होता.
गझल सम्राट म्हणून तलतची ओळख दृढ झाली ती मदन मोहन यांच्यामुळे. मदन मोहन, तलत व जयकिशन हे खूप चांगले मित्र होते. तिघेही नियमित पणे ब्रीचकैंडी स्थित बाम्बेलिस या हॉटेल मध्ये भेटायचे. तिथे त्यांच्या मध्ये पैज लागायची कि  कोणाच्या स्वाक्षऱ्या मागायला सर्वात जास्त चाहते  तिथे गोळा होतात. व दर वेळी ती पैज तलतच जिंकायचे.
तलतच्या याच उदंड लोकप्रियतेमुळे भारताबाहेर संगीत रजनी करणारे पहिले गायक म्हणून त्यांनी मान मिळविला

निर्माता दिग्दर्शक महबूब ख़ान जेव्हा जेव्हा तलतला भेटायचे तेव्हा ते त्याच्या गळयावर आपले बोट ठेवून म्हणायचे... 'ख़ुदा का नूर तुम्हारे गले में है।'
तलतच्या मराठी कनेक्शन बद्दल बोलायचे झाल्यास २ मराठी चित्रपटांसाठी तलतचा आवाज वापरला गेला. त्यापैकी "पुत्र व्हावा ऐसा" या चित्रपटातले "यश हे अमृत झाले" हे गाणे लोकप्रिय ठरले

त्यांचे मराठी साठी महत्वाचे योगदान म्हणजे सुमन कल्याणपूर यांची पारख त्यांनीच केली व एचएमवी कडे त्यांची जोरदार शिफारीशही केली

तलत जसे आपल्या सुरांप्रती विलक्षण जागरूक होते  त्याच प्रमाणे गझलमधील शब्दांसाठी देखील. गीतकार, संगीतकार तलत यांच्या कडे जाण्यापूर्वी म्हणूनच शंभरदा विचार करायचे. शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी या उक्ती वर भरवसा ठेवल्यानेच त्यांची गाणी... हमसे आया न गया, तस्वीर बनाता हूं तस्वीर नहीं बनती, इतना ना मुझसे तू प्यार बढा वगैरे वगैरे आजही अजरामर आहेत



९ मे तलत यांचा स्मृती दिन... या निमित्ताने रसिकांना असेच म्हणावेसे वाटते कि तलत साहेब   तुम्ही जरी स्वतःला  'एक बादल आवारा' समजत असलात  तरी आम्ही मात्र तुम्हाला सुरांची अखंड बरसात करणारा बादल च म्हणणार व तुम्ही जरी म्हणालात कि इतना न   मुझसे तू प्यार बढा तरी आम्ही मात्र हेच म्हणणार कि फिर वोही शाम, वोही गम, वोही तनहाई है, दिल को समझाने तेरी याद चली आयी है

## 'तुम अगर साथ देनेका वाद करो मैं यूँही मस्त नग़मे लुटाता रहूं'



१५ ऑगस्ट किंवा २६ जानेवारी उजाडला कि सकाळी सकाळी कानावर पडतात ते एकाच गायकाचे सूर व ते म्हणजे महेंद्र कपूर. 'मेरे देश कि धरती', 'है प्रीत जहाँ की रीत सदा' या साकरख्या गाण्यांमुळे देशभक्ती गीत व महेंद्र कपूर हे समीकरण पक्के झाले आहे. पण महेंद्र कपूर हे एक व्हर्सेटाईल सिंगर होते व त्यांना पारखले होते ते तब्बल ५ दिग्गज संगीतकारांनी.

सी रामचंद्र, मदन मोहन, नौशाद, अनिल बिस्वास, रवि हे सर्वजण एका स्पर्धेचे जज होते. मेट्रो मर्फी नावाच्या गाण्याच्या स्पर्धेमध्ये तरुण महेंद्र कपूर ने या सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पुढे सी रामचंद्र यांनी नवरंग मध्ये 'आधा है चंद्रमा' या गाण्याद्वारे या होतकरू गायकाला इंट्रोड्यूस केले. नौशाद यांनी देखील 'सोनी महिवाल' मध्ये या गायकाला संधी दिली. पण पुढे आयुष्यात महेंद्र कपूर यांची अतूट जोडी जमली ते संगीतकार रवि बरोबर
रवि - साहिर - महेंद्र कपूर - बी आर चोप्रा या समीकरणाप्रमाणेच, महेंद्र कपूर - मनोज कुमार, महेंद्र कपूर - दादा कोंडके ही समीकरणे पण यशाची हमखास खात्री देणारी ठरली.

महेंद्र कपूर हे स्वतःला रफी साहेबांचे शिष्य मानायचे. रफीचे पण या शिष्यावर अतूट प्रेम होते. पण संधिसाधू चित्रपटविश्व आपली व महेंद्रची गाणी एकत्र रेकॉर्ड करून उगाच आपल्यात स्पर्धा लावतील, आपली तुलना करून दोघांमध्ये कटुता निर्माण करतील म्हणून त्यांनी हा मोह टाळला. पण याला अपवाद ठरले ते आदमी

मधील गाणे. यात रफी गाणार होते दिलीप कुमार साठी तर तलत गाणार होते मनोज कुमार साठी. पण मनोज कुमार ने हट्ट करून आपल्यासाठी महेंद्र कपूरच गाणार असे संगीतकाराकडून कबूल करून घेतले. त्यामुळे ' कैसे हसीन आज बहारोंकी रात' साठी गुरु व शिष्य बरोबर गायले. पण असे करत असताना महेंद्र कपूर यांनी तलत यांचा होकारही घेतला व तलत यांच्या सांगण्यावरूनच ते गाण्यासाठी तयार झाले

रफी असो कि पंडित हुस्नलाल; कोणत्याही गुरूबद्दल महेंद्र कपूर यांना कमालीचा आदर होता. पंडित हुस्नलाल यांच्यासमोर ते कधीही बसले नाही व गुरूंकडून खूपच आग्रह झाला तर ते जमिनीवर बसत पण कधीही त्यांच्या बरोबर खुर्चीत बसत नसत. शिष्याची जागाही गुरु चरणीच असते यावर त्यांची नितांत श्रद्धा होती. रॉयल अल्बर्ट मध्ये एकदा त्यांची मैफिल चालू होती. महेंद्र कपूर यांना तेव्हा कळले कि रफी साहेबांची दोन मूले त्या वेळी प्रेक्षकांमध्ये बसली आहेत. त्यांनी लगेच संयोजकांना दोन हार आणण्याची विनंती केली. कसे बसे दोन हार जवळच्या देवळामधून मिळवण्यात आले. रफींची मूले, खालिद व सय्यद यांच्या गळयात हार घालताना त्यांनी त्या दोघांच्या पायाला स्पर्श देखील केला. तुमच्या मार्फत मुंबई मध्ये बसलेल्या गुरूला ही चरण वंदना आहे हे कपूर यांनी सांगितल्यावर सर्व प्रेक्षकांनी त्यांच्या या गुरु प्रेमाला कुर्निसात केला



श्वास न सोडता गाणं, हे महेंद्र कपूर यांचं वैशिष्ट्य. स्टेज परफार्मन्सला लोकांच्या टाळ्या संपायच्या, पण कपूर साहेबांचा श्वास नाही. राज कपूर बरोबर शो करताना असेच एकदा महेंद्र कपूर यांचे कौतुक प्रेक्षकांनी केले.

तेव्हा राज म्हणाले, ' महिंद्र मी तुला माझ्या चित्रपटामध्ये नक्की संधी देणार. '  त्यावर महेंद्र कपूर म्हणाले, ' तुम्ही मोठे डायरेक्टर; तुम्ही माझी काय आठवण ठेवणार?'  हे ऐकून राज यांनी आपल्या हातावर सिगारेट विझवत वचन दिले कि या सिगरेटचा चटका मला माझ्या वचनाची आठवण करून देतील. 'हर दिल जो प्यार करेगा' या संगम मधील गाण्याची जन्मकथाही अशी आहे

रवि व बी आर चोप्रा यांच्यासाठी महेंद्र कपूर खूप लकी होते. सुरुवात झाली ते 'धूल का फुल' मधील 'तेरे प्यार का आसरा चाहता' पासून. वही यशोगाथा वक्त, हमराज, गुमराह, निकाह अशी वर्षानुवर्षे चालूच राहिली. नीले गगन के तले (हमराज), चलो एक बार फिर से (गुमराह), बीते हुए लम्हों की क़सक साथ तो होगी (निकाह) या गाण्यांनी रसिकांचे कान कित्येक वर्षे तृप्त केले आहेत. कित्येक बाथरूम सिंगर साठी त्यांचे 'ठंडे ठंडे पानी से' हे गाणे म्हणजे वरदानच ठरले आहे


ओ. पी. यांनी देखील महेंद्र कपूर यांचा सुरेल वापर करून घेतला आहे. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे किस्मत मधील 'लाखों हैं यहां दिलवाले' व 'बहारें फ़िर भी आयेगीं' मधील गाणे 'बदल जाए अगर माली चमन होता नहीं खाली'

'उपकार', 'पूरब और पश्चिम', 'क्रांति', 'रोटी कपड़ा और मकान'  या चित्रपटांमुळे महेंद्र कपूर म्हणजे मनोज कुमारचा आवाज हे नाते घट्ट झाले. म्हणूनच मुकेशच्या जाण्याने राजला जे वाटले, रफीच्या जाण्याने शम्मी कपूर यांना जे वाटले नेमके तेच महेंद्र कपूरच्या जाण्याने मनोज कुमारला वाटले.. स्वतःचा आवाज हरपल्याचे जीवघेणे दुःख.

महेंद्र कपूर व मराठी हे नाते देखील सुरेल होते. दादा कोंडके यांचा आवाज ही त्यांची फार नंतरची ओळख. त्याआधी त्यांनी खूप अजरामर गीते गायली. त्यातील आठवण्याजोगी म्हणजे 'ती येते आणिक जाते, येताना कधी कळ्या आणिते.. अन् जाताना फुले मागते' किंवा 'हे चिंचेचे झाड दिसे मज चिनार वृक्षापरी'. रसिकांना, 'सुर तेच छेडीता', 'सांग कधी कळणार तुला', 'रात्रीस खेळ चाले' ही त्यांची गाणी देखील खूप आवडायची..

नाही अजूनही आवडतात.

जेव्हा हिंदी मध्ये किशोर व आर. डी चे वावटळ घोंघावत होते तेव्हा रफी सकट सर्वच गायक काहीसे मागे पडले होते. तेव्हा महेंद्र कपूर यांना हात दिला तो दादा कोंडके यांच्या चित्रपटांनी. 'माझ्यापासुन दुर नको जाउ गंगुबाय' हे अस्सल गावरान ठेक्यात गाणारा महेंद्र कपूर तेव्हा मासेसच्या गळ्यातील ताईत बनला होता महेंद्र कपूर यांचे नाव अजून एका गोष्टीमुळे नवीन पिढीच्या लक्षात राहिले व ते म्हणजे त्यांनी गायलेल्या महाभारत, या टीव्ही वर अतिशय गाजलेल्या मालिकेच्या शीषर्क गीतामुळे.



'दिल लगाकर हम ये समझे' सारखे गीत असो कि 'मेरा रंग दे बसंती चोला' सारखे गीत; महेंद्र कपूर यांनी प्रत्येक रचनेला यथोचित न्याय दिला. आज हा गुणी गायक हयात असला असता तर रसिकांनी त्यांचा सहस्त्र चंद्र दर्शन सोहळा मोठ्या दिमाखात साजरा केला असता व कपूर साहेबांनी पण तो नम्रपणे स्वीकारत म्हटले असते...

**‘तुम अगर साथ देनेका वाद करो मैं यूँही मस्त नग़मे लुटाता रहूं’**

# शहेनशाह - ए - तरन्नुम - मोहम्मद रफी



काही व्यक्तिमत्वे अशी असतात कि त्यांच्या उत्कर्षासाठी खुद्द नियतीलाच योगायोग घडवून आणण्याची घाई झालेली असते. आता हेच बघा ना! एका कार्यक्रमामध्ये के एल सेहगल यांना गायचे होते पण काही कारणास्तव लाईटच गेल्याने माईक बंद पडला. या परिस्थितीमध्ये सेहगल यांनी गायचे नाकारले. चुळबुळ करणाऱ्या अस्वस्थ रसिकांना शांत करण्यासाठी मग नाईलाजाने कार्यक्रमाच्या व्यवस्थापकांना होतकरू गायक रफींना गायची विनंती करावी लागली. रफींनी या संधीचे सोने करत तिथे उपस्थित संगीत दिग्दर्शक श्यामसुंदर यांना प्रभावित केले याच श्यामसुंदर यांनी पुढे रफीची ओळख हिंदी चित्रपट सृष्टीला 'गाव कि छोरी' या चित्रपटाद्वारे करून दिली.

तरीही रफी बराचवेळ स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी धडपडत होते. सेह्गलच्या, 'मरे सपनोंकी रानी, रुही रुही ' या प्रसिद्ध गाण्यात प्रसंगी कोरस मधील एक म्हणूनही ते उभे राहिले. पण परत इथे ही नियतीच त्यांच्या मदतीला धावून आली. नौशाद या प्रसिद्ध संगीतकाराचा लाडका गायक म्हणून त्यावेळी तलत मेहमूद यांचा बोलबाला होता. पण एकदा तलत रेकोर्डिंगच्या वेळी धुम्रपानामध्ये रमले होते. त्यामुळे नौशाद यांचा खोळंबा होत होता. शेवटी नौशाद एवढे चिडले की त्यांनी तलतला काढून त्या ऐवजी रफीला संधी

देण्याचे ठरविले. ती संधी होती बैजूबावराच्या गीतांसाठी. रफींनी त्या संधीचे इतके मोठे चीज केले की पुढे नौशाद -रफीची जोडी संगीतक्षेत्रामध्ये अजरामर म्हणून प्रसिद्ध पावली.

असे म्हणतात कि नियती नेहमीच गुणी, शूर, मेहनती व सज्जन माणसाला ऐतिहासिक कामिगीरीसाठी निवडते. हे आपल्या रफीच्या बाबतीतही तंतोतंत खरे होते. एरवी लता शिवाय देखील आपण लाजवाब संगीताच्या जोरावर एकहाती गाणी हिट देऊ शकतो असा ओ. पी नय्यर यांचा सार्थ अभिमान होता. संगीतकार हा नेहमीच गायकापेक्षा किंवा गायिकेपेक्षा श्रेष्ठ असतो असा त्यांचा तोरा असायचा. पण याच ओ. पी यांनी जाहीर पणे कबूल केले होते की जर रफी नसता तर हा ओ. पी. देखील नसता.

आपल्याकडे काही जणांना किशोर कुमार, रफी पेक्षा ग्रेट वाटतो. कारण किशोर यांच्याकडे आवाजातील विविधता होती. पण तुम्हा सर्वांना नवल वाटेल की याच किशोर दा यांनी आपल्या चाहत्यांना स्टेज शोच्या दरम्यान सांगितले होते की मी जर एखादे गाणे २ - ४ प्रकारे गाऊ शकतो तर तेच गाणे रफी साहेब १०० वेगवेगळ्या प्रकारे गाऊ शकतात. 'नफरत की दुनिया को छोडकर' हे गाणे हाथी मेरे साथी या चित्रपटामधील आहे. ५ - ६ वेळा प्रयत्न करून देखील हे गाणे किशोरला जमेना. तेव्हा त्यांनी संगीतकाराला सांगितले कि या गाण्याला फक्त रफीच न्याय देऊ शकतात

मन्ना डे पण यांनी एका ठिकाणी म्हटले आहे कि मी व रफी सर्व प्रकारची गाणी एकाच ताकदीने गाऊ शकतो. पण रफी यांच्या जागी मीच काय दुसरा कुणीही पोहचू शकत नाही.

चित्रपटांच्या मोहमयी सृष्टीमध्ये राहून देखील रफी मनाने खूप उदार होते. राकेश रोशन यांचा दिग्दर्शक म्हणून पहिला असलेला चित्रपट ‘आपके दिवाने’ साठी रफी यांनी शीर्षक गीत, एकही पैसा मानधन न घेता गायले जितेंद्र यांच्या 'दीदार -ए - यार ' या चित्रपटासाठी रफी एक गाणे गाणार होते. त्याचा मोबदला म्हणून जितेंद्र यांनी २०००० रुपये रफींना दिले. पण माझे मानधन ५००० आहे असे सांगून रफींनी उरलेले पैसे परत केले. 'शोधिशी मानवा' या गीताच्यावेळी पण असेच घडले. मानधन म्हणून त्यांनी प्रसादाचे फक्त फुल स्वीकारले.

हीच उदारता आपल्याला भरभरून प्रेम देणाऱ्या जनतेबाबत त्यांनी दाखविली. वीस लाखाची २ डायलेसीस मशिन्स त्यांनी समाजाला त्याकाळी देणगी म्हणून दिल्या होत्या.

रफींना रसिक, शहेनशाह - ए - तरन्नुम उगाचच म्हणायचे नाहीत. आठवून पहा त्यांचे गाणे, 'बाबुल कि दुवाए लेती जा'. हे गाणे गाताना रफी स्वतः रडले होते. मुलीला सासरी पाठवताना होत असलेल्या विरह अवस्थेची इतकी उत्तम अदाकारी फक्त त्यांनाच जमू जाणे. 'सर जो तेरा चकराए' या गाण्याचा अपेक्षित परिणाम साधण्यासाठी यांनी स्वतःहून, जॉनी वॉकर यांना आपल्या घरी चर्चेला बोलाविले होते अशीच चर्चा रफी व शम्मीकपूर यांच्या मध्ये प्रत्येक गाण्यावेळी होत असे त्यामुळे या जोडीची सगळीच गाणी अजरामर झाली. रफीजी यांचे सज्जन, सात्विक, प्रेमळ व्यक्तिमत्व त्यांच्या आवाजात नकळतच उमटायचे म्हणूनच कांतीलाल सारख्या त्यांच्या सामान्य चाहत्याला एकदा नाही दोनदा हृदयविकाराचा झटका आला असताना रफीजींचा फोटो व आवाजच आपल्याला औषधांबरोबर ठीक ठाक करेल असा विश्वास वाटला; जो सार्थही ठरला. दिग्दर्शक मनमोहन देसाई यांना देखील रफीच्या सुरांमध्ये खुदाचा आवाज जाणवायचा.



हा अद्भुत आवाज हिंदी, मराठी, गुजराथी, इंग्लिश, स्पानिश, डच, क्रेओलि सारख्या आंतरराष्ट्रीय भाषांमध्येही घुमला कधीकाळी कोरस मध्ये गाणाऱ्या या आवाजाला पुढे मोगल - ए - आजमच्या गाण्यामध्ये १०० जणांच्या कोरसची साथ मिळाली.

हिंदी सिनेमाला १०० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आयबीन सिएनएनच्या वतीने एक सर्व्हे घेण्यात आला. त्यात त्यांना ग्रेटेस्ट व्हॉईस ऑफ हिंदी सिनेमा या पदवीने गौरविण्यात

आले. त्याला कारणही तसेच होते. रफीजी परफेक्टशनिस्ट होते. 'सुहानी रात ढल चुकी' या गाण्याचे रेकोर्डिंग मस्त पैकी पार पडले होते पण रफी मात्र त्या रात्री खूप तळमळत होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ते तडक नौशाद यांच्या घरी गेले. अक्षरशः रडत रडतच त्यांनी नौशाद यांना री - रेकोर्डिंग करण्याची विनंती केली नौशाद म्हणाले, "अहो हे गाणे तर मस्तच झाले आहे कि मग हा अट्टाहास का?" त्यावर रफी म्हणाले, "माझ्या मनाला माहित आहे कि मी कुठे चुकलो आहे" प्रत्येक शब्द खास प्रकारेच उच्चारला जावा यासाठी ते आग्रही असत म्हणूनच एस पी बालसुब्रमन्यम यांना 'दिन ढल जाए' या गाण्यातील 'हाय' हा शब्द रफी साहेबांसारखा कोणीही उच्चारू शकणार नाही याची खात्री आहे.


रफींच्या आवाजाबद्दल सांगायचे झाल्यास त्यांच्याच गीताचा आधार घ्यावा लागेल 'तुम मुझे यु भुला ना पाओगे, जब कभी भी सुनोगे गीत मेरे, संग संग तुमभी गुनगुनाओगे. '

३१ जुलै रफी साहेबांचा स्मृती दिन, रफी हा शब्द उलटा केला तर होतो 'फिर'. याच तारखेला कशाला , येतच रफींची आठवण रसिकांना फिरून फिरून रोज रहाणार



## कौन आया मेरे मनके द्वारे

प्रबोध चंद्र डे, एक अस्सल बंगाली व्यक्तिमत्व ज्याला आवड होती ती खेळांची. ते खेळही असे कि ज्या मध्ये प्रतिस्पर्धीला पुरते नामोहरम केल्याशिवाय विजय शक्यच नाही. कुस्ती, बॉक्सिंग या मध्ये रमणाऱ्या प्रबोधला संगीताची जेव्हा आवड लागली तेव्हा देखील हेच किलिंग स्पिरीट त्याने इथेही दाखविले. स्कॉटिश चर्च महाविद्यालयामध्ये सतत तीन वर्षे त्यांनी आंतर - महाविद्यालयीन संगीत स्पर्धा जिंकली. याच प्रबोधला



सर्व हिंदी चित्रपट सृष्टी पुढे मन्ना डे या नावाने ओळखू लागली

मन्ना डे व शास्त्रीय संगीत यांचे बंधन अतूट आहे. जसा कृष्णाचा विषय निघाला कि अर्जुनाचा विषय आपसूकच निघतो तद्वत हे समीकरण आहे. 'तेरे नयना तलाश कर जिसे' हे तलाश चित्रपटामधील मन्ना डे यांचे एक शास्त्रीय संगीतावरील आधारित खूप लोकप्रिय गीत आहे. या गाण्याविषयी इथे एक आठवण सांगणे उचित होईल. तलाश चे दिग्दर्शक सचिन देव बर्मन यांना भेटायला आले होते. तेव्हा सचिनदा यांनी तेथे उपस्थित असलेल्या मन्ना डे यांना एक गाणे गाऊन दाखविण्याची विनंती केली. मन्ना डे आपल्या चित्रपटातील गाणे गाणार म्हटल्यावर दिग्दर्शक

महाशय म्हणाले हे गाणे मुकेश का नाही गाणार? तेव्हा सचिन देव बर्मन म्हणाले कि हे गाणे मुकेश गाऊ शकणार नाही. त्यावर दिग्दर्शक महाशय वैतागून म्हणाले मग असे गाणे बनविलेच कशाला? त्यावर सचिनदा ठाम पणे म्हणाले जर तलाशला माझे संगीत हवे असेल तर मन्ना डेला तुम्हाला स्वीकारावेच लागेल व ही ट्यून तशीच राहील. या गाण्याने पुढे इतिहास घडविला व त्या दिग्दर्शकाला आपण कसे चूक होतो याची जाणीव झाली हे वेगळे सांगायला नकोच.

मन्ना डे यांचे दुसरे लोकप्रिय गीत म्हणजे मेरी सुरत तेरी आंखे मधील ' पुछोना कैसे मैने रैन बितायी'. फ़िल्मफ़ेअर चे पुरस्कार वितरण होते या गाण्यालाच सर्वोत्तम संगीताचा पुरस्कर मिळेल असे मन्ना डे, सचिन देव व संगीत क्षेत्रातील इतर सर्व मान्यवरांना वाटत होते. पण जेव्हा तसे काही प्रत्यक्षात झाले नाही असे मन्ना डे यांजकडून सचिनदा यांना कळले तेव्हा हॉस्पिटल मध्ये एका डोळयाला बँडेज लावून पहुडलेले सचिनदा खूप रडले. सगळ्यांपेक्षा सवाई असून देखील मन्ना डे यांच्या नशिबी नेहमी कर्णाचेच भोग आले पण मन्ना डे मात्र अजरामर लोकप्रिय गाणी गातच राहिले

राज कपूर... त्यांनी आपला आवाज म्हणून मुकेशला जाहीर केले पण आठवून पहा त्यांच्यावर चित्रित झालेली गाणी... मूड मुडके ना देख, ये रात भिगी भिगी, जहां मै जाती हु वही तुम आते हो, मस्ती भरा ये समा, लागा चुनरी मै दाग व अशीच अजून काही गाणी .... ही सर्व गाणी राज कपूर साठी गायली आहेत ती मन्ना डे यांनीच.

तीच कथा बॉलीवूडच्या पहिल्या सुपरस्टार राजेश खन्नाची. आपला आवाज म्हणून त्याने किशोरला नेहमीच पसंती दिली पण जेव्हा अर्थप्रधान, शास्त्रीय गाण्यांची वेळ आली तेव्हा त्यालाही आठवले ते आपले मन्ना डेच. जिंदगी कैसी है पहेली (आनंद), भोर आयी गया अँधियारा (बावर्ची) , नदिया चले, चले रे धारा (सफर), हसने कि चाह ने इतना मुझे रुलाया (अविष्कार).. ही सर्व गाणी दुसऱ्या कोणाच्या आवाजात ऐकण्याची कल्पना ही आपण झोपेत देखील करू शकत नाही.

शास्त्रीय संगीत व ते गाणारे कलाकार यांच्याबद्दल मन्ना डेना खूप आदर होता. त्याचमुळे जेव्हा त्यांना बसंत बहार मध्ये "केतकी, गुलाब, जुही चम्पक बन फूले" हे गाणे भारत भूषण साठी गायची ऑफर आली तेव्हा त्यांनी ती नाकारली. कारण एकच होते व ते म्हणजे हे गाणे एक जुगलबंदी होती व त्यात भारत भूषण त्याच्या प्रतिस्पर्ध्याला हरवणार असतो. प्रतिस्पर्ध्यासाठी पंडित भीमसेन जोशी गाणार होते म्हणजेच मन्ना यांना त्या गाण्यामध्ये पंडितजीना हरवायचे असते. आपल्यापेक्षा सर्वच बाबतीत श्रेष्ठ असलेल्या व्यक्तीला खोटे खोटे हरविणे पण त्यांना मंजूर नव्हते. पण बायकोने खूप समजूत काढल्यावर ते असे करण्यास तयार झाले.
याच्या अगदी उलटे 'पडोसन' चित्रपटाच्या वेळी झाले. 'एक चतुर नार' या गाण्यामध्ये मन्ना डे मेहमूद साठी गाणार होते तर सुनील दत्तसाठी किशोर कुमार. ज्याला शास्त्रीय संगीताबद्दल आपल्यापेक्षा कमी कळते अशा कलाकाराकडून मात खायला ते तयार नव्हते. त्याच मुळे काही वेळासाठी पंचम व मन्ना डे यांच्यामध्ये लटका रुसवा रसिकांना पहावयास मिळाला आपल्या गाण्यात, नेहमीच पूर्णपणे नवीन प्रकारची गायकी व गाण्याचा ढंग असावा असं मन्ना डे यांना वाटायचे. त्यामुळेच माझं गाणं दुसऱ्या कोणासारखं न होता ते केवळ माझ्यासारखंच व्हावं असा त्यांचा नेहमीच प्रयास किंवा हट्ट असायचा. त्यातूनच मग जन्म व्हायचा 'फुल गेंदवा न मारो' सारख्या गाण्याचा. ज्यात रेकोर्ड अडकल्याची तंतोतंत नक्कल त्यांनी आपल्या आवाजातून साकारली. वेस्टर्न पॉप व शास्त्रीय संगीत यांची मजेशीर सांगड घालायचे श्रेय पण आपल्या मन्ना डेनाच जाते

मन्ना डे यांना आपल्या संगीत दिग्दर्शनात गाण्यास राजी करणे येऱ्या गबाळयाचे काम नसायचे त्याचमुळे संगीत कार मदन मोहन यांनी खवय्ये असणाऱ्या मन्ना डे यांना राजी करण्यासाठी आपले पाक कौशल्य वापरण्याचे ठरविले. मदन मोहन यांनी मन्ना डे यांच्या आवडीचे भिंडी गोश्त बनविले व नंतर मेजवानी झोडून तृप्त झालेल्या मन्ना डे ना आपली धून ऐकवली. ते गाणे होते 'देख कबीरा रोया' मधील 'कौन आया मेरे मनके द्वारे'.. या गाण्याने पण इतिहास रचला कारण दोन जिनिअस एकत्र आले होते ना!

ऐ मेरी ज़ोहराजबीं (वक़्त), चलत मुसाफ़िर मोह लिया रे (तीसरी कसम), ये इश्क इश्क है (बरसात की रात), तू प्यार का सागर है (सीमा), सुर ना सजे क्या गाऊँ मै  या सारखी गाणी म्हणजे मन्ना डे अगदी रफी, किशोर, मुकेश, तलत यांपैकी  कोणासारखेही गाऊ शकत याची पावती होती. त्याच मुळे संगीतकार अनिल बिस्वास नेहमी म्हणायचे कि मन्ना डे कोणासारखेही गाऊ शकतात पण इतर गायक मन्ना डे प्रमाणे गाऊच शकतील असे नाही

मन्ना डे यांनी मराठी चित्रपटातील खूप गाण्यांना  आपला आवाज दिला होता. मन्ना डे यांच्या स्वरांची मोहोर उमटेलेल्या अनेक गाण्यांपैकी काही गाण्यांनी अमाप लोकप्रियता मिळविली. 'घन घन माला नभी दाटल्या कोसळती धारा' हे 'वरदक्षिणा' चित्रपटातील गाणे, 'एक धागा सुखाचा' या चित्रपटातील 'अ आ आई, म म मका, मी तुझा मामा, दे मला मुका', संगीतकार सी. रामचंद्र यांनी संगीत दिलेले 'नंबर फिफ्टी फोर, हाऊस इज बांबू डोअर', 'हॅप्पी जॉल्ली सारे, आनंदाने गाऊ, होम स्वीट होम' (चित्रपट- 'जावई विकत घेणे आहे') ही यादी न संपणारी आहे



"तू छुपी है कहाँ.... " सारखे विरह, व्याकुळता  दर्शविणारे गीत असो कि 'चुनरी संभाल गोरी' सारखे धमाल गीत मन्ना डे नेहमीच कानसेनांची तृप्ती करत राहिले आहेत.  मन्ना डे यांच्या जाण्यानंतर येणारा त्यांचा हा पहिलाच जन्मदिन... या निमित्त शास्त्रीय संगीताच्या या बेताज बादशाहाला रसिकांचा कुर्निसात

## बेकरार कर के हमें यूं न जाइए, आप को हमारी कसम लौट आइए



हेमंत कुमार म्हटले कि डोळ्यासमोर उभी राहतात ती धीर गंभीर आवाजातील सुमधुर गीते व एकापेक्षा एक गूढ, रहस्यमय गाणी ज्याला आपण हॉनटिंग मेलोडीज देखील म्हणतो. त्याचप्रमाणे हमिंग साऊंड असलेली त्यांची कित्येक गाणी आजही लोकप्रियतेच्या शिखरावर आहेत

हेमंत कुमार लोकांना आवडतात ते विविध कारणांमुळे....

कोणाला गायक म्हणून ते आवडतात तर कोणाला संगीतकार म्हणून. तर काही समिक्षाकारांना त्यांनी निर्माता म्हणून काढलेले चित्रपट भुरळ घालायचे. बंगाल मध्ये तर रवींद्र लोकसंगीताची पालखी पुढे घेऊन जाणारे आदरणीय व्यक्तिमत्व म्हणून त्यांचे गुणगान आजही गायले जाते

'या दिल की सुनो दुनिया वालों, या मुझको अभी चूप रहने दो' असे जेव्हा ते गायचे तेव्हा खरोखरच आपणही पूर्ण चित्त देऊन त्यांचे सूर ऐकायचो व नकळतच भावूक, अंतर्मुख व्हायचो. या उलट जेव्हा ते ' है अपना दिल तो आवारा' असे गुणगुणायचे तेव्हा आपणही फ्लर्ट करण्याच्या मूड मध्ये शिरायचो.

हेमंत कुमार यांचा जन्म १६ जून चा. कारकीर्दीच्या सुरुवातीलाच त्यांची भट्टी सलिल चौधरी यांच्या बरोबर

जमली.  'कोनो एक गायेर बधू' हे हेमंत दा व  सलीलदा यांचे पहिले कॉम्बिनेशन सॉलिड हिट झाले कम्युनिस्ट लोकांबरोबर लागे बांधे असल्याने सलीलदा यांच्या मागे पोलिसांचा ससेमिरा लागला होता. ते सुंदरबनच्या जंगलामध्ये लपले होते. त्यांच्या गैरहजेरीमध्येच हेमंत दा  यांनी हे गाणे रिलीज केले. सलिल दा, हेमंत दा यांच्या आवाजाच्या   प्रेमामध्ये आकंठ  बुडाले होते कि त्यांची अशी श्रद्धाच झाली  होती कि देव जर या भूतलावर उतरला व त्याला गावेसे वाटले तर तो हेमंत दा यांच्याच आवाजात गाईल

हेमंत दा यांची हिंदी मधील सुरुवात झाली ते आनंदमठ या चित्रपटापासून. संगीतकार म्हणून त्यांचा तो पहिला चित्रपट, लताच्या आवाजातील 'वन्दे मातरम' या गीतामुळे अजरामर ठरला

सचिन दा यांनी हेमंत दा यांना सर्व प्रथम 'जाल' या चित्रपटामध्ये गाण्याची संधी दिली. 'ये रात ये चांदनी फिर कहाँ' अशी साद घालत त्यांनी रसिकांना सुरांच्या चांदण्यामध्ये सफर घडवून आणली. त्या नंतर मात्र सचिन दा, हेमंत दा व देव आनंद या त्रिकुटाने त्यांच्या मोहजालात रसिकांना अनेक वर्षे गुंतवून ठेवले

बात एक रात की या चित्रपटातील एक गाणे आहे... "न तुम हमें जानो, न हम तुम्हें जानें, मगर लगता है कुछ ऐसा मेरा हमदम मिल गया" पण हेमंत दा यांचे अक्षय सूर एका रात्रीची सोबत करण्यापुरते नव्हते तर जन्मोजन्मीची सोबत करण्यासाठी होते त्यामुळेच 'गंगा-जमुना' मध्ये "इंसाफ़ की डगर पे बच्चों दिखाओ चल के, ये देश है तुम्हारा" साठी नौशाद यांनी हेमंत  दा  यांना निवडले तर 'जाग दर्दे इश्क जाग' साठी सी रामचंद्र यांनी

एक संगीतकार असून देखील हेमंत दा यांना  इतर संगीतकारांनी निवडले यातच सर्व काही आले. मराठी पुरते बोलायचे झाल्यास 'मी डोलकर, डोलकर दर्याचा राजा' व 'गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय' या दोन गाण्यांनीच हेमंत दा यांनी मराठी रसिकांना आपलेसे करून घेतले. 'प्रीतीच्या चांदराती' हे असेच एक हेमंत दा यांचे सुरेल मराठी गाणे. हेमंत दा फक्त विविध भारतीय भाषांमध्येच गायले नाहीत तर चक्क हॉलीवूड मध्येही गायले  बाल्टिमोर सिटीचे मानद नागरिकत्व देऊन अमेरिकन सरकारने त्यांच्या योगदानाचा गौरव केला

हेमंत दा यांनी चित्रपट निर्मिती देखील केली.. बीस साल बाद, कोहरा, खामोशी  असे एकाहून एक सरस चित्रपट त्यांनी निर्माण केले. या चित्रपटांमधील हॉन्टिंग व हमिंग गाणी आजही हेमंत दा यांच्या  सिग्नेचर ट्यूुन्स म्हणून ओळखल्या जातात.  या ट्यूुन्स मधील 'कही दीप जले कही दिल' या गाण्याबद्दल एक खास आठवण निगडीत आहे.

‘The hound of Baskervilles’ या चित्रपटावर 'बीस साल बाद ' हा चित्रपट बेतला होता. त्याकाळी लता खूप आजारी होत्या व त्यामुळे नाईलाजाने हेमंत दा यांनी गीता दत्त यांना  गायिका म्हणून निवडले होते पण गीता दत्त यांना काही केल्या 'दुश्मन हैं हज़ारों यहा जान के,  ज़रा मिलना नज़र पहचान के' या ओळीमधील अपेक्षित परिणाम साधता येत नव्हता तेव्हा हेमंत दा लता कडे गेले.   त्या काळात लता दीदी आपला आत्मविश्वास हरवून बसल्या होत्या. त्यांना वाटत होते कि आजारपणामुळे त्यांच्या आवाजातील जादू संपली आहे. त्यामुळे हेमंत दा यांनी हळूच न सांगता लता यांची एक रिहर्सल, फायनल रेकोर्डिंग म्हणून करून टाकली. या गाण्यातील आपला आवाज ऐकून लता यांचा आत्मविश्वास परत जागा झाला



हेमंत दा यांनी क्ले व्होयलिन, बासरी व मेंडोलीन या वाद्यांचा मुबलक वापर आपल्या गीत रचनांमध्ये केला. क्ले व्होयलिन वापरून नागीण मधील प्रसिद्ध बीन वाजवण्यात आली.ही धून वाजवली होती ते कल्याणजी -आनंदजी जोडीतील कल्याणजी यांनी. त्या गाण्यातच संगीत कार रवि यांनी हार्मोनियम वाजवली होती. कल्याणजी -आनंदजी  व रवि हे दोन संगीत कार म्हणजे हेमंत दा यांचीच देणगी आहे

अनुपमा, साहब, बिवी और गुलाम, जागृती, प्यासा, हाउस नंबर ४४... अजरामर रचनांची यादी लांबलचक आहे. " जरा नज़रों से कह दो जी", "जाने वो कैसे लोग थे जिनको...", "तेरी दुनिया में जीने से तो बेहतर है कि मर जाएं", " तुम पुकार लो" **अशा अवीट गाण्यांमुळे हेमंत दा, रफी, किशोर, मन्ना डे, मुकेश, महेंद्र कपूर, व सेहगल यांच्या सप्तर्षी मधील एक झगमगता तारा ठरले**

हेमंत दा जरी आज आपल्यात नसले तरी रसिकांना ते नेहमीच 'छुपा लो यूँ दिल में प्यार मेरा' असे आग्रही आर्जव करतात. त्यावर रसिकांना म्हणावेसे वाटते कि बेकरार कर के हमें यूं न जाइए, आप को हमारी कसम लौट आइए .



## तू कहे अगर.. जीवनभर मैं गीत सुनाता जाऊ



मुकेश... हिंदी चित्रपट संगीताच्या सुवर्ण युगातील, रफी, मन्ना डे, किशोर यांच्या सारखा अजून एक बिनीचा शिलेदार. मुकेश म्हटले कि पटकन आठवतात ती राज कपूर वर चित्रित झालेली असंख्य अवीट गाणी. पण मुकेश हा काही राजकपूरचा फाईंड नव्हता. आपल्या मुकेशला हुडकून काढले ते जुन्या जमान्यातील प्रसिद्ध नट मोतीलाल यांनी. एका लग्नामध्ये मोतीलाल यांनी मुकेशचा आवाज ऐकला व ते इतके प्रभावीत झाले कि त्यांनी मुकेशला संगीत क्षेत्रातील लोकांशी गाठभेट घालून देण्यासाठी तडक मुंबईला आणले. पण मुकेशची सुरुवात या चित्रपट सृष्टीमध्ये सुरु झाली ते अभिनेता म्हणून. 'निर्दोष' नावाच्या चित्रपटामध्ये काम केलेल्या मुकेशला गायनातील पहिला ब्रेक मिळाला ते 'पहली नजर' या चित्रपटासाठी.. तोही तब्बल ४ वर्षांनी. यात योगायोग असा कि ज्यांनी त्याला या क्षेत्रामध्ये आणले त्या मोतीलाल यांच्यावरच मुकेशचे पहिले वहिले गाणे चित्रित झाले.

मुकेश हे के एल सेहगल यांचे निस्सीम चाहते होते त्यामुळेच त्यांच्या गायनाची ढब सेहगल यांच्याशी खूप मिळती जुळती होती. इतकी मिळती जुळती कि मुकेश ने गायलेलं गाणे, ' दिल जलता है तो जलने दो' हे गाणे ऐकून सेहगल म्हणाले, " काय आश्चर्य आहे ना! मी हे गाणे कधी गायले हे मलाच आठवत नाही".

मुकेशला सेहगलच्या  सावलीतून बाहेर पडण्यास मदत केली ते संगीतकार नौशाद यांनी. अंदाज मध्ये मुकेश गायला ते दिलीप कुमार साठी, राज कपूर साठी  आवाज होता तो  रफीचा.  पण कालांतराने हेच चित्र उलटे झाले.

'सब कुछ सिखा हमने' असे राज साठी गाणाऱ्या मुकेशला फिल्म फ़ेअरच्या रूपाने सब कुछ मिळाले.. यश, प्रसिद्धी व पैसा.

मुकेश व राज हे समीकरण इतके अतूट होते कि राज नेहमी म्हणायचे कि 'मैं तो बस शरीर हूं मेरी आत्मा तो मुकेश है।' म्हणूनच जेव्हा मुकेशच्या निधनाची वार्ता राज कपूर यांना कळली तेव्हा ते म्हणाले, "आज मी माझा आवाजच हरपून बसलो आहे". मुकेश, अमेरिकेला जाण्यापूर्वी शेवटचे गीत गायले होते व तेही राज कपूरच्याच 'सत्यम शिवम सुंदरम' साठी. गाणे होते; 'चंचल, शीतल, निर्मल कोमल... ' अशा प्रकारे मुकेश यांनी राज कपूर यांची साथ निभावली अगदी मृत्यू नंतर हि. कारण हा चित्रपट मुकेशच्या निधनानंतर प्रदर्शित झाला होता



मुकेश हे परम राम भक्त होते. ते रोज राम चरित मानस वाचायचे म्हणूनच कि काय जेव्हा ते तुलसी रामायण गायले तेव्हा त्यांची सर्व श्रद्धा त्यांच्या आवाजात ओतप्रत भरली गेली. त्यांनी गायलेले तुलसी रामायण म्हणून आजही अक्षय आहे

मुकेश यांच्या बद्दल अनेकांना खूप आदर होता. संगीतकार सलिल चौधरी म्हणायचे, "मुकेशच्या ओठातून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द

मोती बनतो . त्यांचा सूर हा या जगातील नाहीच मुळी!" तर गीतकार हसरत जयपुरी म्हणाले, " वो सुर का देवता था जाने कहाँ छुपा है, ‘हसरत’ का दिल उसे तो रह रह के ढूंढता है I जो गीत उसने गाया वो गीत ही अमर है I"

मुकेश यांना दर्दभऱ्या गाण्यांसाठी ओळखले जाते. मुकेश स्वतः एका मुलाखतीमध्ये म्हणाले होते कि जर मला १० हलकी फुलकी गाणी व एका दर्दभऱ्या गाण्याचा पर्याय दिला तर मी दुसरा पर्याय निवडेन व जर मला १० दर्दभऱ्या गाण्यांचा व एका शास्त्रीय गाण्याचा पर्याय दिला तर मी एक शास्त्रीय गाणे निवडेन. पण बहुदा सचिनदा सारख्या संगीतकारांचा मुकेशच्या शास्त्रीय पैलूवर जास्त भरवसा नव्हता. खरेतर मुकेश एवढा लोकप्रिय होऊच कसा शकतो. असा त्यांचा सवाल असायचा. सचिनदांनी म्हणूनच जवळ जवळ १२ वर्षे मुकेश यांना संधीच दिली नव्हती पण काळाचा महिमा अगाध असतो; याच सचिनदा यांना बम्बई का बाबू व बंदिनी साठी मुकेश यांना घ्यावेसे वाटले व जेव्हा मुकेश पूर्ण ताकदीनिशी, 'चल री सजनी अब क्या सोचे' व 'ओ जाने वाले हो सके तो लौट के आना' गायले तेव्हा सचिन दा यांना आपल्याच विचारसरणी वरती अपराधी वाटले

"सावन का महीना पवन करे सोर... " या गाण्याच्या वेळेचीही गोष्ट आहे. मुकेश नुकतेच हृदयाच्या दुखण्यातून सावरत होते. या गाण्यात नायक नायिकेला शिकवत आहे अशी सिच्युअशन आहे. त्यामुळे नायकाला गीतामध्ये आलाप गाणे जरुरी होते पण मुकेश यांच्या तब्येतीकडे पाहून लक्ष्मीकांत प्यारेलाल यांना मुकेश यांना तसे सुचविणे अवघड जात होते. मुकेश व लता या दोघांना देखील आलाप किती गरजेचा आहे याची जाणीव होती. म्हणूनच मुकेश यांनी लता यांच्याशी पैज लावली कि जर ते नीट गायले नाहीत तर लताला शंभरची नोट मिळेल पण जर ते उत्तम रित्या गायले तर लता त्यांना शंभरची नोट देईल.. गाण्याच्या रेकोर्डिंगच्या सुरुवातीलाच मुकेश यांनी शंभरची नोट लताला दाखवत आपल्या शर्टच्या वरच्या खिश्यात सरकवली. इथे एल पी यांना काहीच कल्पना नव्हती. दुसरा अंतरा झाल्यानंतर आलापाची गरज होती.

ती जागा वाद्यवृन्दाच्या सहाय्याने भरण्याचा एल पी यांचा इरादा होता पण झाले भलतेच; मुकेश यांनी सुरेख आलाप घेतला व सगळे अचंबित झाले. मुकेश हे गाण्याच्या बाबतीत किती समर्पित होते याचे हे उत्तम उदाहरण होते.

मुकेश हे सहृदयी पण होते, जेव्हा त्यांना कळले कि एक आजारी मुलगी आपली गाणी ऐकायला बैचेन आहे तेव्हा ते कोणताही आढावेढा न घेता गरीब बाईच्या त्या आजारी मुलीला भेटायला गेले. त्या मुलीच्या आईने जेव्हा त्यांचे आभार मानले तेव्हा उलटे मुकेशच म्हणाले कि मीच  तुमचा आभारी आहे कारण माझ्या गाण्याचा असा उपयोग झालेला पाहून मलाच खूप समाधान लाभले आहे.




'जाने कहां गए वो दिन'. व  'दोस्त-दोस्त ना रहा'..ही मुकेश यांना स्वतःची आवडणारी गाणी होती. पण रसिकांना मात्र असे भाग्य लाभले नाही कारण मुकेशची सर्वच गाणी त्यांना अजूनही आवडतात; मग ते 'कई बार युंही देखा' असो कि ' मैं पल दो पल का शायर'. रसिकांना अशी दोन चारच गाणी बाजूला काढणे शक्यच होणार नाही. कारण  त्यांना माहित आहे कि मुकेश म्हणजे त्यांच्यासाठी ‘मैं ने तेरे लियेही सात रंग के सपने चुने’ असे म्हणणारे सुरांचे जादुगारच आहेत

# ‘हमें तुम से प्यार कितना'



किशोर कुमार; खऱ्या अर्थाने एक अजब रसायन होते. त्यांच्या बद्दल कुठून व कशी सुरुवात करायची हे सुचतच नाही. त्यांचे खरे नाव 'आभास कुमार' होते. म्हणूनच की काय त्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्वच आभासी वाटायचे. कधी ते हरहुन्नरी गायक वाटायचे तर कधी अत्यंत पराकोटीचे विक्षिप्त माणूस वाटायचे. कधी ते हास्य अभिनेता वाटायचे तर कधी एक हळवा, संवेदनशील दिग्दर्शक.

लहानपणापासूनच गायक बनायचे स्वप्न बघणाऱ्या लहानग्या किशोरला एकदा सचिन दा यांनी बाथरूम सिंगरच्या रुपात ऐकले. ते लगेच अशोक कुमारला म्हणाले, " तुझा भाऊ गातो बरा"; सोबतच किशोरला म्हणाले, "तुझा आदर्श सेहगल असेल ही पण त्यांच्या गायकीचे अनुकरण करण्यापेक्षा स्वतःची स्वतंत्र गायकी विकसित कर". किशोरने ते म्हणणे मनावर घेतले व यॉडलिंग करायला शिकले. त्यांना यॉडलिंगची प्रेरणा टेक्स मोर्टन व जिमी रौजरच्या रेकॉर्ड्स ऐकून मिळाली. पुढे जाऊन हेच यॉडलिंग किशोरची ओळख बनली

अभिनेता म्हणून किशोरला करिअर करण्यात फारसा रस नव्हता तरी त्याला पहिला ब्रेक मिळाला ते 'शिकारी' चित्रपटामध्ये तर गायक म्हणून ब्रेक मिळाला ते खेमचंद प्रकाश यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली 'जिद्दी' या चित्रपटामध्ये.


शास्त्रीय संगीताचा गंधही नसलेल्या किशोरच्या गायकीबद्दल दिग्गजांच्या मनात किंतु असणे स्वाभाविकच होते. आपले लाडके बिमल दा **'नौकरी '** चित्रपट बनवत होते. त्याचे संगीतकार होते सलिल चौधरी. सलील दा यांच्या मनात हेमंत दा यांचे नाव पक्के झाले होते पण बघूया तरी हा नवीन पोरगा कसा गातो या विचाराने त्यांनी किशोरचे गाणे ऐकले. तो आवाज ऐकला खरा; लगेचच त्यांनी आपला निर्णय फिरविला व किशोरला एक अजरामर गाणे देऊ केले. ते होते, 'छोटासा घर होगा बादलों की छाँव में, आशा दीवानी मन में बंसुरी बजाये'

सुरुवातीच्या काळात किशोरची ओळख देव आनंदचा आवाज म्हणून होती. त्यामुळे त्याला काही सुरेख गाणी देखील गायला मिळाली होती, पण किशोरचे करिअर तरी देखील उतरणीला लागले होते हे सत्य होते. राहुल देव बर्मन किशोरला या पडत्या काळात हात द्यायला पुढे सरसावला. नवोदित राजेश खन्ना साठी, त्याच्या **'आराधना'** साठी त्याने किशोरला बोलावले. किशोर अडचणीमध्ये असून देखील नवीन राजेशसाठी आपला आवाज द्यायला तयार नव्हता. पण आपला जिवलग मित्र आर डीचा आग्रह तो मोडू शकला नाही. पुढचा इतिहास मग सगळ्यांनाच ठावूक आहे. 'रूप तेरा मस्ताना' साठी किशोर कुमार यांना फिल्मफेअर मिळाले व मग आर डी, राजेश व किशोर हे त्रिकुट एवढे बिझी झाले की देव आनंद साठी किशोरकडे वेळच उरला नाही. रूप तेरा मस्तानाची चाल खरेतर सचिन दा यांनी भाटीयाली लोकसंगीतावर आधारित रचली होती. प्रणय गीताला ही चाल बिलकुल फीट नव्हती पण सचिन दा हट्टालाच पेटले होते. ते शक्ती सामंत, आर डी कोणाचेच ऐकत नव्हते अशावेळी किशोर दा म्हणाले. "सचिन दा तुमचीच जुनी चाल वापरूया. 'एकटू पोडे शाशुरबाडी'वाली" रूप तेराच्या जन्माची कथा ही अशी होती

‘खईके पान बनारसवाला’ ह्या गाण्यात पडद्यावर अमिताभने तर पडद्यामागे किशोर दा यांनी खूप धमाल केली आहे. **‘डॉन’** चित्रपटाच्या उत्तरार्धात जरा गरजेपेक्षा जास्तच तणाव वाढला आहे हे पाहून या गाण्याची पेरणी करण्यात आली होती. हे सजेशन दिले होते जावेद अख्तर यांना मनोज कुमार यांनी. या गाण्यामध्ये जिवंतपणा आणण्यासाठी किशोर जी हे गाणे पान खाऊन गायले. स्टुडियोमध्ये गाताना पान थुंकायचे कुठे हा प्रश्न होता. त्यासाठी मग पूर्ण स्टुडियो मध्ये पोलिथिन शिटस अंथरायला लागल्या. त्यांच्या या अत्रंगीपणाला दाद मिळाली ते फिल्मफेअरच्या रुपामध्ये .

किशोरच्या आवाजाला अकारण ब्रेक लागला तो इंदिराजी यांच्या आणीबाणीमुळे. वीस कलमी कार्यक्रमाचे गुणगान करणारे गाणे न गायल्यामुळे इंदिराजी यांच्या काँग्रेस सरकारने किशोर यांच्या गाण्यांवर अघोषित बंदी लादली. आपला आवाज रसिकांपर्यंत पोहचू शकत नाही याच्याहून मोठे दुःख कलाकारासाठी दुसरे असूच शकत नाही.

किशोर यांचे विक्षिप्तपणाचे किस्से देखील खूप मशहूर आहेत. ते आपल्या मोबादल्याप्रती जर जास्तच



आग्रही असायचे. आधी दाम मग चोख काम हा त्यांचा क्लिअरकट फंडा होता. **भाई भाई**च्या सेट वर पैसे मिळाले नाही म्हणून समरसोल्ट मारत सेट वरून नौ दो ग्यारह होणारे किशोर, एकदा अर्धाच मोबदला मिळाला म्हणून सेटवर, चेहऱ्यावर एकाच साईडला मेक अप करून आले होते

**'प्यार किये जा'**च्या सेट वर किशोर, मेहमूद व ओमप्रकाश हे तिघेही हास्य अभिनेते काम करत होते. तिघांचे रोल्स सशक्त व तितकेच महत्वाचे होते. पण जेव्हा किशोरजींना कळले कि मेह्मुद्‌लाच फक्त जास्त मानधन मिळत आहे तेव्हा ते नाराज झाले. त्यांनी ते शल्य मनातच ठेवले. जेव्हा मेहमूद **पडोसन** चित्रपट बनवत होते तेव्हा किशोरला बाजी उलटविण्याची संधी मिळाली. त्यांनी जेव्हा मेह्मूद्‌पेक्षा जास्त मोबदला पदरात पाडून घेतला तेव्हाच त्यांच्या मनातील शल्य दूर झाले

किशोरदा यांच्या पैशाच्या ह्या मोहापायीच त्यांच्या हातून एक अविस्मरणीय रोल निसटला. **आनंद** चित्रपट करताना हृषीकेश मुखर्जी यांनी एका वळणावर किशोर व मेहमूद यांची निवड केली होती. त्याच संदर्भात हृषीदा किशोरला भेटायला त्याच्या घरी गेले होते. त्यावेळी किशोर खूप बैचेन होते. एका बंगाली इव्हेंट मेनेजरसाठी म्हणजे त्याने आयोजित केलेल्या एका स्टेजशो साठी किशोर गायले होते पण त्यांचा मोबदला मात्र पेंडिंग होता. त्यामुळे रागारागानेच त्यांनी आपल्या चौकीदाराला बजावले होते की कोणी बंगाली बंगल्याच्या गेटवर आला तर त्याला अपमानित करून उलट्या पावलीच परत पाठवा. हृषिदा यांचा बंगाली पेहराव बघून चौकीदाराचा गैरसमज झाला व त्याने हृषिदा यांनाच माघारी पाठविले.

मराठी मध्ये ज्या प्रमाणे 'गुळाचा गणपती' म्हणजे सबकुछ पु ल होते त्याचप्रमाणे हिंदीमध्ये 'दूर गगन की छाव में' म्हणजे सबकुछ किशोर होते. त्याचे असे झाले कि किशोर अभिनेता, गायक वगैरे असल्याने त्यांच्यावर तगडा आयकर लावण्यात आला होता. यातून मार्ग काढण्यासाठी त्यांनी एक पडेल चित्रपट काढायचा ठरविला ज्यात गायक, अभिनेता, संगीतकार, निर्माता, दिग्दर्शक तेच असतील ज्यायोगे भरमसाट तोटा दाखवता येईल. पण झाले उलटेच बाप व (मुक्या बहिऱ्या) लेकाचे तलम नाते उलगडून दाखविणारा

'दूर गगन की छाव में' चित्रपट अत्यंत यशस्वी ठरला. यात त्यांच्याच मुलाने म्हणजे अमित कुमार ने मुलाची भूमिका साकारली होती

आपल्या मराठी पुरते बोलायचे झाल्यास किशोर ने 'अश्विनी ये ना!' मध्ये खूप धमाल केली आहे. अमराठी किशोरला गाणे गाताना अडचण येऊ नये म्हणून त्यासाठी असे काही खास बोल लिहिले गेले कि ज्यात ‘ळ’ व ‘ड’ ही अक्षरे जाणीवपूर्वक वगळण्यात आली  आपल्या लाडक्या किशोरच्या आठवणी तर असंख्य आहेत, त्यातल्याच काही आठवणींना मी इथे उजाळा दिला ते त्याचा ४ ऑगस्ट या जन्मदिनाचे औचित्य साधून. अजून काही मस्त आठवणी त्यांच्या स्मृतीदिनी म्हणजे १३ ऑक्टोबरला ऐकुया. तो पर्यंत किशोरजी यांच्याच भाषेत निरोप घेतो.. चला जाता हूँ, किसी की धून में, धड़कते दिल के तराने लिये; मिलन की मस्ती भरी आखों में, हज़ारो सपने सुहाने लिये. पण माझ्या सारख्या सर्व रसिकांना किशोर जी यांना मात्र वेळोवेळी हेच सांगावेसे वाटते की, ' तुम्ही जरी आमचा निरोप घेतला असला तरी ‘हमें तुम से प्यार कितना ये हम नहीं जानते मगर जी नहीं सकते, तुम्हारे बिना '



# अंजाम-ए-महफ़िल

असं एखादं छानसं पुस्तक वाचून संपताना आपली “ अभी न जाओ छोडकर- के दिल अभी भरा नहीं “ अशी अवस्था होतेच. पण प्रत्येक मैफ़लीची सांगता होतेच. याही महफ़िलीची सांगता ’फ़िर मिलेंगे’ च्या नोटवर होत आहे. ही मैफ़ल तुम्हाला कशी वाटली ते prashant.dandekar@rediffmail.com किंवा esahity@gmail.com वर कळवा. आपल्या प्रतिक्रियांवरूनच पुढल्या मैफ़लीची आखणी सुरू होईल. अशा एक से एक दिग्गजांची मैफ़ल रंगवू. सारे काही आपल्या वाचकांच्या प्रतिक्रिया आणि फ़र्माईशींवर अवलंबून राहील. तेव्हा आपल्या प्रतिक्रिया लवकर येऊ द्यात. फ़ेसबुकवर esahity च्या पेजवर किंवा प्रोफ़ाईलवरही आपण आपल्या प्रतिक्रिया नोंदवू शकता.

आमचा पत्ता :esahity@gmail.com
अधिक माहितीसाठी भेट द्या :www.esahity.com

आपले नम्र

**टीम ई साहित्य प्रतिष्ठान**